**Code No. 07**

Total No. of Questions : 74 ]

Total No. of Printed Pages : 4 ]

**June/July, 2010**

# MARATHI

Time : 3 Hours 15 Minutes ] [ Max. Marks : 100

**सूचना :** i) **सर्व** प्रश्न आवश्यक आहेत.

ii) उजवीकडील अंक प्रश्नांचे गुण दर्शवितात.

I. खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा : 1 × 10 = 10

1) परिक्षेच्या निकालाचा दिवस

2) माझा आवडता लेखक

3) मला लॅटरी लागली तर

4) आजची जागृत स्त्री

5) थांबला तो संपला.

II. अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची एक-दोन वाक्यात उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

6) अळजपूरची स्त्री कोणत्या यात्रेला जात होती ?

7) कोणत्या झाडांना हाथ लावू दिला जात नव्हता. का ?

8) आंबेडकर मास्तर शाळा सूरु झाल्यावर कोठे जात ?

9) साने गुरुजीना कोणत्या गोष्टीचा विषाद वाटत असे ?

10) आपल्या देशाचा फार मोठा समाज हजारो वर्ष कशापासून वंचित होता ?

11) सेवक जखमीना कोणाकडे पाठवत होते ?

12) संताचा धर्म कोणता ?

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा : 1 × 6 = 6

13) डॉ० आंबेडकरांची संस्कृत व पर्शियन भाषे बाबतची मते कोणती होती ?

14) संताच्या साहित्याची वैशिष्ट्ये कोणकोणती ?

15) वैद्यराज आदिनाथांच्या वैद्यक धर्माचे स्वरूप स्पष्ट करा.

[ Turn over

क) खालीलपैकी कोणत्याही **दोन** वर टीपा लिहा : 2 × 4 = 8

16) साने गुरुजी आणि निसर्ग सौंदर्य.

17) संत ज्ञानेश्वरांचे कार्य.

18) माध्यमांतर.

19) व्यर्थ धडपडीतून दिसणारे निवेदकाचे व्यक्तित्व.

ड) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**चा ससंदर्भ स्पष्टीकरण करा : 2 × 3 = 6

20) 'राउळ ऐसे काइ करीती ? आणि करीति तरि करीतिः
आणि काइः तरि राउळचि मज आंणीक देतिः''

21) ''लढणाऱ्याला जात असते, पक्ष असतो. मरणाच्या दारात असलेल्यांना एक जात. एकच पक्ष असतो तो म्हणजे आसन्मरण सैनिक.''

22) ''कोंबडे झाकलं म्हणून ताबडं फुटायचं रहात नाही.''

23) ''ज्ञानभाषा एक आणि लोक भाषा दुसरी अशी हिंदुस्थानची जीवनाची परंपरागत कहाणी आहे.''

III. अ) खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची एक-दोन वाक्यात उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

24) परिस म्हणजे काय ?

25) रुक्मिणीचे कोणावर प्रेम होते ?

26) आयुष्य वितळवून सोन्याचे घड ओतणारे कोण आहेत ?

27) चिखलाच्या नेत्रावर कोणते स्वप्न आहे ?

28) दारात आल्यानंतर तिला वाटले.

29) आपली पुरातन संस्कृती कशी आहे ?

30) कुणाबरोबर खेळ मांडून गावे असे कवी म्हणतो.

ब) खालीलपैकी कोणत्याही **एका** प्रश्नाचे उत्तर लिहा : 1 × 6 = 6

31) लोकांनी चांगले म्हणावे, तर आपण कोणत्या गोष्टीचा त्याग केला पाहिजे.

32) श्रीकृष्ण व रुक्मिणी यांच्या विवाह प्रसंगाचा सारांश तुमच्या शब्दात लिहा.

33) आपल्या पुरातन संस्कृतीत कोणता दोष असल्याचे कवी म्हणतो ?

क) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टीपा लिहा : 2 × 4 = 8

34) संत नामदेवाचा संत संघ.

35) एका नव्या संघर्षात कवितेचा सारांश.

36) स्तब्ध, तृप्त पाणी असणारे तळे.

37) तणकटाचं बी.

ड) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**चा संदर्भासह अर्थ स्पष्ट करा : $2 \times 3 = 6$

38) ''सरिता ओघ जाय सिंधुसि मिळून ।
तैसे भेटे नारायण संत संगे ॥''

39) ''अशाश्वताच्या समशेरीवर शाश्वताची फुटेल ढाल.''

40) ''दऱ्याखोऱ्यात रानात लाट तेजाची वाहते.''

41) ''ह्या नभाने ह्या भूमीला दान द्यावे
आणि माझ्या पापणीला पूर यावे.''

IV. खालीलपैकी कोणत्याही **दोन** प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : $2 \times 5 = 10$

42) बकसचे चुलता आणि चुलतीमुळे बकसला होणारा त्रास तुमच्या शब्दात व्यक्त करा.

43) कलिंगड हा आई-मुलीच्या संबंधाचा दुवा आहे — हे स्पष्ट करा.

44) गोष्ट तिची मधील नायिकेच्या मनात चालणाऱ्या विचारावर प्रकाश टाका.

45) अंगणातला पोपट मधील नर्मदा मावशीचा स्वभाव चित्रित करा.

V. अ) खालीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर बातमी तयार करा : $1 \times 5 = 5$

46) तुमच्या गावात मलेरिया रोगाने प्राणहानी झाल्यांची बातमी तयार करा.

47) तुमच्या आवडत्या लेखकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाल्याची बातमी तयार करा.

48) तुमच्या महाविद्यालयात संपन्न झालेल्या वार्षिक स्नेह सम्मेलनावर बातमी तयार करा.

ब) कंसातील सूचनेनुसार प्रश्न सोडवा. $5 \times 1 = 5$

49) मी मुंबईला जाईन. ( भूतकाळ करा )

50) ती गाणे गाते. ( प्रयोग ओळखा )

51) रस्त्याच्या बाजूने जायला पाहिजे. ( आज्ञार्थी वाक्य तयार करा )

52) प्रकाश ( अभ्यास ) लक्ष घालत नाही. ( सामान्य रूप तयार करा )

53) अनुकंपा वाटणे, नजराणा देणे. ( वाक्यात उपयोग करा )

54) प्रारंभ, स्मरण ( विरुद्धार्थी शब्द लिहा )

क) अधोरेखित शब्दाच्या विभक्ती ओळखा : $5 \times 1 = 5$

55) <u>मधूचा</u> धाकटा भाऊ पुस्तक वाचतो.

56) <u>रामाने</u> सेतु बंधनाचे अत्यंत महान कार्य केले.

57) रमेश <u>दिल्लीहून</u> उद्या येणार आहे.

58) तू शाळेच्या <u>वसतीगृहात</u> राहतोस.

59) बंधु <u>भगिनीनो</u> । कामाला सुरुवात करा.

ड) समानार्थी शब्द लिहा : 5 × 1 = 5

60) नयन

61) वस्त्र

62) अमृत

63) धरती

64) जल.

इ) इंग्रजी शब्दांना पर्यायी मराठी शब्द लिहा : 5 × 1 = 5

65) इन्चार्ज

66) टेंपररी

67) वर्कींग

68) कम्युनिटी

69) रूल.

VI. उतारा वाचून दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : 5 × 1 = 5

इंडोनिशियातील सुमात्रा बेटा जवळ 26 डिसेंबरला सकाळी सहा वाजून अठ्ठावीस मिनिटांनी समुद्रात 89 रिश्टर स्केलचा भूकंप झाला. गेल्या चार दशकातला हा सर्वात भीषण भूकंप होता. त्यामुळे समुद्राच्या तळाला एक हजार किलोमीटर लांबीची भेग पडली. या भूकंपाचे प्रभावक्षेत्र आग्नेय व दक्षिण आशियात कांही चौ० मैल होते. या भुकंपामुळे निर्माण झालेल्या उर्जेची क्षमता हिरोशिमा नागासाकीवर टाकलेल्या अणुबॉम्बच्या हजारो पट होती. या उर्जेने समुद्रात महाकाय लाटा निर्माण झाल्या. त्या लाटा तासी 500 किमी वेगाने किनार पट्टीकडे सरकल्या. सुनामीचा फटका श्रीलंका, इंडोनीशिया, थायलंड, मलेशिया या देशांना बसला.

70) सुमात्रा बेटा जवळ कोणत्या तारखेला भूकंप झाला ?

71) समुद्राच्या तळाला किती किमी ची लांबीची भेग पडली ?

72) या लाटा तासी किती किमी वेगाने सरकल्या ?

73) कोणत्या देशांना फटका बसला ?

74) योग्य शीर्षक द्या.